स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 28–05–2012 रोजी सकाळी 11–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 8. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 12. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 13. | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 2. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 3. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर. झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 39 :– कामठी रोड इंदोरा येथील आनंद वस्तीत जाणाऱ्या मार्गावरील स्वास्थ विभागाचे कार्यालयातील ब्लॉक मध्ये जेष्ठ नागरीकांकरीता विरंगुळा केन्द्र व कार्यालयासाठी 340 चौ. फुट बांधकामाचे क्षेत्रफळ नाममात्र भाडे रु. 1/– प्रती चौ. फुट प्रती महिना प्रमाणे 3 वर्षाचे अस्थायी भाडेपट्टयावर "प्रबुध्द जेष्ठ नागरीक संस्था", इंदोरा यांना देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. महासभेचा धोरणात्मक निर्णय झाल्यावर योग्य निर्णय घेण्यास्तव विषय कर्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 40 :– नागपूर महानगरपालिका जकात विभागाच्या विविध नाक्यावरुन देण्यात येणा–या व समर्पीत करुन घेणा–या रहदारी पास बाबत कार्याचे संगणकीकरण बाबतच्या कामाचा दि.01.04.2012 पासून सेवाकर (service tax) मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांचे मार्फत शासनास भरण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेला संगणीकृत सेवा अंतर्गत दयावयाचा सेवाकर (service tax) या प्रलंबित विषयाबाबत मा. आयुक्त यांनी दि. 29.03.2012 रोजी एक सभा आयोजित केली. या सभेत अति. उप निगम आयुक्त (1), सहा आयुक्त (जकात), मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर उपस्थित होते. मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांनी हे प्रकरण म.न.पा. स्तरावर प्रलंबित असल्या कारणाने त्यांना दंडापोटी रुपये 15,41,974/– दंड भरावा लागला म्हणून ही रक्कम परताव्या साठी व पुढील कालावधी साठी सेवा कराची रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत मा. आयुक्त यांना विनंती केली.

उपरोक्त कामाच्या करारनाम्याप्रमाणे हे काम मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना दहावर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आले आहे. या करारनाम्यातील मुद्दा क्र. 4 प्रमाणे मान्य केलेल्या दरात सेवा शुल्क अंतर्भुत आहे. याच करारनाम्याच्या मुद्दा क्र. 24 प्रमाणे जर ही सेवा, सेवाकराच्या अंतर्भुत आली तर लागणा–या सेवाकर मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना सेवाकर नियमाप्रमाणे भरावयाचा आहे.

सेवा कर परिपत्रक क्र. 334/1/2010 – TRU दि. 26.02.2010 प्रमाणे माहिती तंत्रज्ञान सेवा, सेवाकरांच्या अंतर्भुत दि. 26.02.2010 पासून समाविष्ट करण्यात आलेला आहे व हा कर सेवा कर, ज्या संस्थेला सेवेचा लाभ मिळत आहे. त्यांनी सेवा निर्गमित केलेल्या संस्थेमार्फत भरावयाचा आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे करारनाम्यातील मुद्दा क्र. 4 व 24 मध्ये संभ्रमितपणा असल्यामुळे या विषयाबाबत कायदयाचे वरिष्ठ सल्लागार ॲड. श्री. कप्तान यांचे अभिमत घेण्यात आले. त्याच्या सल्लानुसार करारनाम्यातील मुद्दा क्र. 24 मध्ये सेवाकर (service tax) या नियमात बदल करण्यात यावा जेणेकरुन महानगरपालिकेला सेवा कर भरता येईल.

उपरोक्त प्रमाणे मा. आयुक्त यांनी मुद्दा क्र. 24 मध्ये दि. 01.04.2012 पासून बदल करण्याचे निर्देश दिलेत. या विषयावर सविस्तर चर्चा केल्यानंतर असा निर्णय घेण्यात आला

की, नागपूर महानगरपालिकेला उपरोक्त कामाचा सेवाकरापोटी येणारा खर्च महानगरपालिका दि. 01.04.2012 पासून वहन करील परंतू दि.01.04.2012अगोदर या करापोटी झालेला खर्च वहन करणार नाही. सेवाकर (service tax) रुपात होणारा खर्च सुध्दा जकात विभागास प्राप्त होणा–या प्रशासकीय शुल्क रुपये 10/– मधूनच करण्यात येईल.

माहिती तंत्रज्ञान सेवा अंतर्गत सेवाकर (service tax) नागपूर महानगरपालिकेव्दारे दि.01.04.2012 पासून पुढे शासनास भरण्याबाबत च्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन सेवा कर परीपत्रक क्र. 334/1/2010 दि. 26.02.2010 तसेच कार्यालयाने मागितलेल्या मुद्दा क्र. 4 व 24 मध्ये प्राप्त कायद्याच्या अभिमताप्रमाणे व प्रशासनाच्या सुचने प्रमाणे विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 41 :– जकात विभागतील असमर्पित पास धारक नोटीस कार्यवाही करुन सुध्दा एक महीन्याच्या आत जकात विभागाची उचित कार्यवाही न केल्यामुळे अशा असमर्पित रहदारी पास धारकाकडून दंड वसुल करून म.न.पा. खात्यात जमा करणेचे काम मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर ला देण्याबाबत.

जकात नियम क्र.16 अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीवेळी ज्या आयातकर्त्यानी आगमन जकात नाक्यावर रहदारी पास जारी करण्यात आलेली आहे. त्या आयातकर्त्यानी विहीत कालावधीत जकात नाक्यावर रहदारी पास समर्पीत करून मालासह म.न.पा. च्या सिमेच्या बाहेर जाणे गरजेचे आहे. परंतू बरेचशे आयातकर्ते गमन नाक्यावर न थांबताच मालासह म.न.पा. सीमेबाहेर निघून जातात अशा असमर्पीत रहदारी पास धारकांवर कार्यवाही होणे गरजेचे असल्यामुळे असमर्पीत रहदारी पास धारकांची यादी प्राप्त होणेकरीता प्रतिदीन जारी केलेल्या रहदारी पास व गमन नाक्यावर समर्पीत केलेल्या रहदारी पास हयाबाबत ताळमेळ (Reconcillation) होणे गरजेचे असल्यामुळे या कामास सन 2006 पासून सुरवात करण्यात आली. सदरहू कालावधीत जकात विभागातील नाक्याचे संगणकीकरण झालेले नसल्याने हे काम Manually करण्यात आले. परंतु पुरेशा कर्मचारी वर्ग नसल्याने सदर्हू कालावधीत पूर्ण काम झालेले नाही. याच कारणांने असमर्पित पास धारकांवर वेळीच कार्यवाही होवू शकलेली नाही. दिनांक 21 जुन 2007 पासून जकात विभागांतील नाक्यावरून रहदारी पास issue करणे व समर्पित करण्याचे कामाचे पूर्णता संगणकीकरण करण्यात आले. रहदारी पास issue करणे व समर्पीत करणे हया कामाचे संगणकीकरण करण्यात आले. यामुळे असमर्पीत रहदारी पास धारकांच्या वाहनांची यादी प्राप्त होवू लागली. परंतू सदर्हू असमर्पित रहदारी पास धारंकावर Notice कार्यवाही करणेकरीता संबंधीतांच्या पत्याची गरज असल्याने प्रतिदीन प्राप्त होणाऱ्या लाखो दस्ताऐवज मधून संबंधीताचे पत्ते Manually शोधून नोटीस कार्यवाही करण्यास विलंब होवू लागला. त्यामुळे संबंधीत दस्ताऐवज वेळीच scanning होवून संगणक प्रणालीत संगृहीत होणे गरजेचे झाल्याने संबंधीत दस्ताऐवजाच्या scanning चे काम सप्टेंबर 2009 पासुन सुरू करण्यात आले. तेव्हापासून असमर्पित रहदारी पास धारकांवर वेळीच नोटीस कार्यवाही होवू लागली व सदरहू कार्याद्वारे असमर्पित रहदारी पास च्या संख्येचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होवू लागलेले आहे. आजस्थितीत प्रतिदीन सरासरी 1% रहदारी पास असमर्पीत असतात.

केलेल्या नोटीस कार्यवाहीवर काहीच असमर्पित रहदारी पास धारक गार्भीयाने घेवून जकात विभागाची उचित कार्यवाही करून घेतात. परंतू जे असमर्पित रहदारी पास धारक नोटीसचे congnigence घेत नाही, अशा असमर्पित रहदारी पास धारकांवरदंड वसुलीची कार्यवाही होणे हेतू दिनांक 21 जुन 2007 च्या अगोदरच्या असमर्पित रहदारी पास धारकांवर सुद्धा कार्यवाही होणेकरीता जकात विभागाद्वारे EOI मागविण्यात आलेले होते व सदरहू कामाचा scope खालीलप्रमाणे होता.

(1) दिनांक 21 जुन 2007 च्या अगोदर Manually issue करण्यात आलेल्या व समर्पित करण्यात आलेल्या रहदारी पास ची record ची संगणकात entry घेणे (जुन 2005 ते जुन 2007 कालावधीतील) व असमर्पित रहदारीपास धारकांची यादी तयार करून नोटीस print करून जकात विभागास सादर करणे.

(2) ज्या असमर्पित पास धारकांवर नोटीस कार्यवाही करून सुद्धा त्या असमर्पित रहदारी पास धारकांनी एक महिन्याच्या आत जकात विभागाची उचित कार्यवाही करून घेतलेली नाही, अशा असमर्पित रहदारी पास धारकांकडून जकात विभागाची आवश्यक दंड वसुली करणे.

संबंधीत कामाकरीता व्यापारी लिफाफ्यातील दरानुसार M/s. V.I.P.L. यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| (1) | सन 2005–2006 आणि 2006–2007 हया वर्षाकरीता रहदारी पास issue करणे व समर्पित करणे संबंधीत माहितीची संगणकात entry करणे | रू.4/– प्रति रहदारी |
| (2) | असमर्पित रहदारी पास धारकांकडून दंड म.न.पा. खात्यात जमा करणे | रू.300/– प्रति प्रकरण |

तसेच EOI च्या scope मध्ये नसतांना सुद्धा M/s. V.I.P.L. यांनी खालील कामाकरीता दर सादर केले आहे.

''संबंधीत रहदारी पास अंतर्गतचा माल म.न.पा. सीमेत खाली केल्याचे प्रकरण संबंधीत एजन्सीने उघडकीस आणल्यास संबंधीत प्रकरणांत म.न.पा.स प्राप्त होणाऱ्या दंडनिय रक्कमेचा 5% खर्च''

संबंधीत दराबाबत वित्त विभाग द्वारा केलेल्या शिफारसी मा. निगम आयुक्त यांचे आदेशाकरीता ठेवण्यात आले असता मा. निगम आयुक्त यांनी दि.29/03/2012 ला मा. अति. उपनिगम आयुक्त (1), सहा. आयुक्त (जकात) व कंत्राटदार M/s. V.I.P.L. चे Managing Director यांची बैठक घेतली. सदरहू बैठकीत मा. निगम आयुक्त यांनी असे मत व्यक्त केले कि,

(1) दि.21/07/2007 अगोदरच्या Record ची घ्यावयाच्या Entry बाबतच्या कामाकरीता रू. 3.50 प्रति रहदारी पास.

(2) असमर्पित रहदारी पास धारकांकडून दंड वसुली च्या कामाकरीता रू.250/– प्रति प्रकरण दर.

(3) रहदारी पास अंतर्गत चा माल म.न.पा. सीमेत खाली करून जकात चोरी करणेचे प्रकरण उघडकीस आणल्यास रू.250/– प्रति प्रकरण दर संबंधीत एजन्सी M/s. V.I.P.L. यांनी मान्य करावेत. तसेच जुन 2007 च्या अगोदरच्या काळातील घेण्यात येणाऱ्या Record ची Data Entry करीता रू.3.50 प्रति रहदारी हया दराने दयावयाचे

दयेयकाची रक्कम असमर्पित रहदारी पास धारकांकडून वसुल होणाऱ्या दंड वसुली रक्कमेतूनच देण्यात येईल व सदरहू दयेयक दंड वसुलीपेक्षा जास्त असू नये, असे निश्चित करण्यात आले.

उपरोक्त प्रमाणे Negotiation करण्यात आलेल्या दरांना संबंधीत M/s. V.I.P.L. यांनी दि.30/03/2012 च्या पत्रान्वये स्वीकृती दर्शविलेली आहे. आर्थीक वर्ष सन 2005–2006 व आर्थीक वर्ष सन 2006–2007 हया कालावधीतील जारी केलेल्या व समर्पीत केलेल्या रहदारी पास ची माहिती संगणकात Entry करून घेणे व दस्ताऐवज Scan करणे व असमर्पीत रहदारी पास ची यादी काढून नोटीस print करणेचे कामास अंदाजे रू.1.15 करोड खर्च होणेची शक्यता आहे व सदरहू खर्च असमर्पीत रहदारी पास धारकांकडून प्राप्त होणाऱ्या दंड वसुली रक्कमेतून करण्याचे प्रस्तावित आहे. सदरहू खर्च अंदाजपत्रक पद क्र.110 मधून करण्यात येईल.

उपरोक्त प्रस्ताव मंजुर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 42 :— जकात विभागाच्या विविध नाक्यावर संगणीकृत जकात पावती जारी करणे, दस्ताऐवज Scanning करणे, connectivity व्दारे वेळोवेळी आवश्यक माहिती संगणकाव्दारे प्राप्त होण्याचे काम (BOT तत्वावर) मेसर्स विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना देण्याबाबत

उपरोक्त विषयांतर्गत जकात विभागाच्या विविध नाक्यावर संगणीकृत जकात पावती जारी करणे, दस्ताऐवज Scanning करणे, connectivity करण्याचे काम BOT तत्वावर मेसर्स विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना स्थायी समिती ठराव क्र. 636 दि. 11.02.2009 अन्वये तीन वर्षाकरीता देण्यात आले. या कामाची मुदत दि. 31.03.2012 ला संपत आहे.

संबंधित काम सुरळीत ठेवण्याचे दृष्टीकोनातून व सुरु असलेल्या कामाची मुदत दि. 31.03.2012 ला संपत असल्यामुळे जकात विभागाने प्रस्ताव दि. 29.02.2012 ला सादर केला. संबंधित प्रस्तावानुसार प्रस्तावित करण्यात आलेले होते की, कार्यादेश क्र. NMC/OCT/947/AMC दिनांक 02.03.2009 अन्वये सुरु असलेल्या कामाच्या करारनाम्यातील कलम 14 व कलम 12 नुसार महानगरपालिका व कत्रांटदार दोघांचे संगणमताने पुढील तीन वर्षाकरीता संबंधित कंत्राट वाढविणेबाबत किंवा नविन निविदा काढणेबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

मेसर्स विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना जकात विभागाचे पत्र दिनांक 5.03.2012 व 19.03.2012 अन्वये नुसार त्यांना दिलेल्या मंजुर दरावर पुढील तिन वर्षाकरीता काम करावयाचे असल्यास आपली सहमती दर्शविण्यास्तव पत्र पाठविण्यात आले. या पत्राचे उत्तरात मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांनी त्यांचे पत्र दि. 30.03.2012 अन्वये हे काम तिन वर्षाकरीता रुपये 7.95 + 10.3% सेवा कर (service tax) प्रति transation प्रमाणे करण्याची इच्छूकता दर्शविली व त्याबाबत सोबत Justification सुध्दा दिले आहे. संबंधितांच्या offer बाबत विचार करीत असतांना पुढील बाबी विचारात घेण्यात आल्या.

(1) मेसर्स विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांनी हा प्रकल्प जकात विभागाचे काम 24 तास 7 ही दिवस सुरु असतांना चांगल्या रीतीने व कौशल्याने पार पाडले.

(2) हे काम नविन एजन्सीला दयावयाचे झाल्यास त्यांना संपूर्ण संगणकप्रणली लावावी लागेल, नविन नेमणूका कराव्या लागेल, त्यामुळे नविन नेमणूक केलेल्या कर्मचा–यास जकात विभागाचे काम समजून घेण्यास वेळ दयावा लागेल. त्यामुळे जकात उत्पन्नावर त्याचा परिणाम होईल.

(3) नुकतेच मुंबई महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका यांनी अशाच प्रकारच्या कामाकरीता प्रसिध्द केलल्या निविदा प्रकियेत प्राप्त झालेले दर नागपूर महानगरपालिकेतील सध्या असलेल्या दरापेक्षा खुपच जास्त आहेत.

(4) मा. स्थायी समिती ठराव क्र. 40 दि. 28.05.2010 व या ठरावास मा.आयुक्त व्दारा प्राप्त झालेल्या अंमलबजावणी नुसार जर या कामाकरीता नविन निविदा बोलावून काम करावयाचे झाल्यास या नविन निविदा प्रक्रियेत जे निम्मत्तम(Lowest) दर येतील त्याच दरावर मेसर्स विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना ते जर निम्मत्तम(Lowest) दरावर काम करण्यास तयार असतील तर त्यांना लघुत्तम दर प्राथम्य (First Right to Refusal) अंतर्गत काम दयावे लागेल.

(5) मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना तिन वर्षाकरीता काम देण्यात आले होते. त्यावेळी करारनाम्यांनुसार करारनाम्यातील नियम क्र. 12 नुसार पुन्हा त्यांना काम देण्याचे झाल्यास महानगरपालिका व मेसर्स विदर्भ इन्फोटेक नागपूर यांच्या सहमतीने मुदतवाढ देण्यात येईल असे उल्लेखित आहे. सदर्हू बाबीच्या अनुषंगाने संबंधितांनी दिलेल्या offer करीता Negotiation करण्याचे प्रस्ताव मा. आयुक्त यांचे समक्ष सादर करण्यात आले असता, मा. आयुक्तांनी याबाबत बैठक बोलाविली या बैठकीत मा. अति. उप निगम आयुक्त (1), सहा आयुक्त (जकात), मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर उपस्थित होते. या बैठकीत मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांचेशी वाटाघाटी ( negotiation ) करण्यात आले. व मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना पुढील तिन वर्षाकरीता रुपये 6/– **+** सेवा कर (service tax) प्रमाणे जकात विभागाच्या विविध नाक्यावर संगणीकृत जकात पावती जारी करणे, दस्ताऐवज Scanning करणे, connectivity व्दारे वेळोवेळी आवश्यक माहिती संगणकाव्दारे प्राप्त होण्याचे काम देण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच जकात पावतीवर प्रशासकीय शुल्क रुपये 5/– ऐवजी रुपये 10/– प्रति जकात पावती आकारण्यास सुध्दा निर्णय घेण्यात आला. वसुल करण्यात येणा–या प्रशासकिय शुल्क रुपये 10/– यामधूनच मेसर्स विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांचे कामाचे भुगतान करण्यात येईल (भुगतान म्हणजेच दर **+** सेवा कर (service tax)). उर्वरीत रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात जमा होईल असे प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त प्रमाणे मे. विदर्भ इन्फोटेक प्रा. लि. नागपूर यांना जकात विभागाच्या विविध नाक्यावर संगणीकृत जकात पावती जारी करणे, दस्ताऐवज Scanning करणे, connectivity व्दारे वेळोवेळी आव''यक माहिती संगणकाव्दारे प्राप्त होण्याचे काम (BOT तत्वावर) पुढील तिन वर्षाकरीता रू.6/– + सेवाकर प्रति transaction (प्रति जकात रशीद) प्रमाणे देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास बहुमताने मंजूरी प्रदान केली.

(मा. सदस्य प्रफुल्ल गुडधे व पुरुषोत्तम हजारे यांनी विरोध दर्शविला.)

ठराव क्रमांक 43 :— नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोनल कार्यालया मध्ये दैनंदिन कामाकरीता लागणारी आवश्यक संगणकाची प्लेन व प्रि—प्रिन्टेड स्टेशनरी, कंझुमेबल्स व साहित्य सन 2012—13 एक वर्षाच्या कालावधीकरीता नविन दर करार करण्याकरीता ई—निविदा बोलविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदेचा मसुदा स्थायी समिती समोर ठेवण्याच्या अटीवर विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 44 :— नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोनल कार्यालया मध्ये असलेली मालमत्ता व इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरीता सन 2012—13 व 2013—14 असे दोन वर्षाच्या कालावधी करीता शासनाचे किमान वेतन व इतर लागू असलेले भत्ते मिळून, खाजगी सुरक्षा एजेंसी कडून नविन ई—निविदा बोलविण्याकरीता मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा काढतांना किमान वेतन अधिनियमामध्ये 1948 च्या अटीप्रमाणे अंमल करावा या अटीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 45 :— नागपूर शहराच्या विविध दहनघाटावर मृतदेहांना अग्नी देण्याकरिता वार्षिक अंदाजे 6700 टन लाकडांची गरज भासत असून लाकुड पुरवठा करण्यासाठी दोन वर्षाकरीता निविदा मागविण्याचा व खरेदीवर अपेक्षित वार्षिक खर्च रु. 1,90,23,750/— पद क्र. 249 मधुन भागविण्याचा तसेच निविदा मंजूर होईपर्यंत जून्याच मंजूर दरावर लाकडे खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 46 :— नागपूर शहरातील सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांच्या बाजुला असलेले फायबरचे मुत्रीघर, बांधकाम केलेले मुत्रीघर व प्रभागांमधील सार्वजनिक शौचालयाची स्वच्छतेच्या दृष्टीने निगा व देखभाल ठेवण्याकरिता यांत्रिकी पध्दतीने साफ सफाई करण्यासाठी दोन वर्षाच्या कालावधीकरीता निविदा मागविण्याचा व निविदा प्रक्रिया पुर्ण होईस्तोवर जुन्या मंजुर दरावर काम पूढे सुरु ठेवण्याच्या तसेच या कामावर होणारा वार्षिक अंदाजीत खर्च रु. 1,27,87,120/—पद क्र. 213 व 178 मधून किंवा इतर उपलब्ध प्रावधानामधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 47 :– स्थायी समिती ठराव क्र. 115 दि. 03.11.2011 अन्वये सदर रोग निदान केन्द्र येथे सिटी स्कॅन, सोनोग्रॉफी, इको, कलर डॉपलर, व एक्सरे मशीन इत्यादी सुविधा करिता मे. नाईसा डायलोकेअर, गांधी ले–आऊट, नागपूर यांचे सर्वात कमी दर ( CGHS दरापेक्षा 7.5% टक्के कमी दर) प्राप्त झाले असुन सुध्दा त्यांचे नातेवाईक म.न.पा. सेवेत कार्यरत असल्या कारणास्तव सदरचे काम दूसऱ्या क्रमांकावर असलेल्या मे. सोनु सिटी असोसिएट्स, नागपूर यांनी समदरावर करण्याची लेखी तयारी दर्शविल्यामुळे मे. सोनु सिटी असोसिएंटस, नागपूर यांना नमूद दरांवर प्रथम पांच वर्षाकरिता रु. 1/– प्रति चौरस फुट प्रमाणे दवाखाना/प्रकल्प चालविण्याकरिता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 48 :– वाहतुक पोलीस दक्षिण शाखा अंतर्गत – पंचशील चौक ते लोकमत चौक पर्यंत च्या

1) गोवारी उड्डान पुलाच्या खाली – दोन चाकी वाहन करीता
2) रस्त्याच्या डावे बाजू ( East Side of Road ) – चार चाकी वाहन करीता
3) रस्त्याच्या उजवे बाजू ( West Side of Road ) – नो पार्कींग आणि
4) पंचशील चौक पत्रकार भवन जवळील पार्कींग लॉट्स ( 8X 80 mtr size ) येथे दोन चाकी आणि चार चाकी वाहन करीता

'' पे ॲन्ड पार्क '' योजना राबविण्याकरिता म.न.पा. चे पंजीकृत कंत्राटदार श्री. नितीन शांतीलाल केशरवानी यांची रुपये 16,66,666/– प्रति वर्ष ची एकमेव ई–निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 49 :– वाहतुक पोलीस पश्चिम शाखा अंतर्गत – लिंक रोड– गड्डीगोदाम चौक ते रेसीडेन्सी रोड (मंगलदीप जंक्शन पर्यंत )

1) रस्त्याच्या डावे बाजू – दोन चाकी वाहन करीता
2) रस्त्याच्या उजवे बाजू –
   1. एम.एस.ई.बी. ऑफीसच्या कंपाऊन्ड समोर –
      अ. गड्डीगोदाम चौक, मुख्य अभियंता (एम एस ई बी) ऑफीस गेट पासून ते एम.एस.ई.बी. मेन गेट पर्यंत – हॉकर्स झोन करीता आरक्षीत
      ब. एम.एस.ई.बी. मेन गेट पासून ते रंगीलाल मार्ग ॲप्रोच पर्यंत – चार चाकी वाहन करीता
   2. डॉ. रंगीलाल मार्ग अप्रोच पासून ते सदर पी.डब्ल्यु.डी. ऑफीसच्या गेट पर्यंत – चार चाकी वाहन करीता
   3. सदर पी.डब्ल्यु.डी. ऑफीसच्या गेट पासून ते मंगलदीप जंक्शन अप्रोच पर्यंत – दोन चाकी वाहन करीता

'' पे ॲन्ड पार्क '' योजना राबविण्याकरिता प्राप्त मे. जाधव एन्ड जाधव कंपनी यांची रुपये 5,75,100/– प्रति वर्ष ची एकमेव ई– निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 50 :– स्थायी समिती ठराव क्रं. 71 दिनांक 20.07.2010 अन्वये मे. ग्रिन थंब इन्नोवेटर प्रा. लि. या कंपनीची मंजूर निविदा अंतर्गत नागपूर शहरातील शहर बस मार्गावर ग्रुप –6 ते ग्रुप –10 अंतर्गत असलेले एकुण 197 बस स्टॉप च्या ठिकाणामधून बदल झालेले 103 प्रस्तावित नविन बस शेल्टर च्या ठिकाणाला स्थायी समिती ठराव क्रं. 692 दिनांक 2.03.2009 अन्वये मंजूर ग्रुप – 1 ते ग्रुप– 5 मधील ठिकाणाशी तुलना करवुन त्या करिताचे मंजूर दराप्रमाणे प्रति बस शेल्टर प्रति वर्ष प्रमाणे रॉयल्टी लावण्यास आणि या प्रमाणे एकुण 197 बस शेल्टर करीता सुधारीत रायल्टी रक्कम रुपये 14,78,800/– प्रति वर्ष प्रमाणे घेण्यास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न विचारार्थ घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन फीझोबिलीटी रिपोर्ट स्थायी समिती सादर करण्याच्या अटीवर विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 51 :– भगवान नगर मराठी प्राथ. शाळा, बॅनर्जी ले–आऊट, नागपूर ही मनपाची शाळा बंद स्थितीत असून शाळा इमारत किरायाने उपलब्ध होण्याकरिता अर्जदार रुकमन पात्र मेमोरियल सोसायटी, नागपूर तर्फे रश्मी भारव्दाज 178, आदिवासी कॉलनी, नागपूर यांना शाळा इमारत किरायाने मागितल्यानुसार त्यांच्या संस्थेस उपरोक्त शाळा मासिक किराया रु. 24,800/– प्रमाणे शाळेच्या इमारतीमधील तळ मजल्यावरील तीन रुम व पहिल्या मजल्यावरील तीन रुम असे एकुण सहा खोल्या देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेऊन म.न.पा. महासभेचा धोरणात्मक निर्णय झाल्यावर योग्य निर्णय घेण्यास्तव विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 52 :– शहरातील विविध रस्त्यांचे कडेला तसेच मोकळया मैदानांच्या सभोवताल वृक्ष लागवड करुन त्यांची एक वर्षापर्यंत जोपासना करण्याचे कामाकरीता रुपये 3,07,16,602/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी तसेच याकरीता नियमित निविदा बोलविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 53 :— वार्ड क्र. 28,नाग नदीवरील भरतवाडा गांवा जवळील जुना पूल तोडून नविन पूल बांधकामाचे उर्वरित काम पूर्ण करण्यास्तव रु.59,14,935/— रक्कमेची सन 2012—13 मध्ये तरतूद उपलब्ध करुन देणे तसेच मंजूर निविदाकार मे. अबरार अहमद, यांना कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 54 :— नविन प्रशासकीय इमारतीच्या " Construction of Fire Escape Staircase, Rain Water Harvesting System, Box Culvert and Entry, Exit main gate in NMC Premises, Civil Lines,NMC, Nagpur, या कामाकरिता बोलविण्यात आलेल्या निविदा राशी रु. 6520086/— च्या कामाची निम्नतम निविदाकार M/s Dep Construction यांची रुपये 75,48,304/— या रकमेची प्राकलनीय दरापेक्षा 15.77 अधिक दराची निम्नतम निविदा स्विकार करण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 55 :— वार्ड क्र. 90, धोबीघाट नाल्यावर मेन ग्रेट— नागरोडवर पुल बांधण्याच्या कामाकरिता निम्मतम निविदाकार मे. बिंद्रा कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दरापेक्षा 13.86 टक्के कमी दराची रु. 42,98,296/— च्या निम्नतम निविदेस स्थायी समिती ठराव क्र. 1019, दि. 28.03.2011 नुसार मंजुरी प्राप्त आहे व यानुसार कंत्राटदारास रु.42,98,296/— चा कार्यादेश देण्याचा आलेला आहे. प्राकलनानुसार कंत्राटदारास पुलाचे 30 मीटर लांबीचे काम करावयाचे होते. परंतु एकुण पुलाचे बांधकाम 37.00 मीटर लांब करावयाचे असल्यामुळे उर्वरित 7.0 मीटर लांबीचे पुलाचे बांधकामाकरिता मंजुर निविदा दरावर रु. 6,91,599/— चे प्राकलन तयार केलेले असुन यास मा. आयुक्त यांनी दि.05.05.2012 ला मंजुरीप्रदान केलेली आहे. करिता या प्रस्तावास मान्यता देवून कंत्राटदार मे. बिंद्रा कन्स्ट्रक्शन कंपनी यांना पुलाचे उर्वरित काम करण्याकरिता रु. 6,91,599/— चा कार्यादेश प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 56 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /– हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /– दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर